# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ३८१/२०२३ दिनांक – ३०/१०/२०२३

## रिक्षामधुन प्रवास करत असतांना गहाळ झालेले रु २,१०,०००/- किंमतीचे ४० ग्रॅम वजनाचे मंगळसुत्र तक्रारदार यांना २४ तासाच्या आत परत मिळवुण देण्यास माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण पथकास यश

माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीत महिला नामे सपना साबाजी सडवेलकर, वय ४३ वर्षे, धंदा गृहिणी, रा. रुम नं. ३०२ बिल्डींग नं. ४७ बी, साई सुमन सोसायटी, कार्निवाल सिनेमा जवळ, एव्हरशाईन सिटी, वसई पुर्व, जि. पालघर हया दिनांक २७/१०/२०२३ रोजी १७.३० वा. एव्हरशाईन सर्कल ते वसई पुर्व रेल्वे स्टेशन येथे जाण्यासाठी एव्हरशाईन सर्कल रिक्षा स्टॅण्ड येथुन प्रवासादरम्यान त्यांचे रु २,१०,०००/- किंमतीचे ४० ग्रॅम वजानचे मंगळसुत्र गहाळ झाल्याचे निदर्शनास आल्याने त्यांनी माणिकपुर पोलीस ठाणे येथे हजर होवुन झालेल्या घटनेबाबत माहिती दिली होती. सदर बाबत माणिकपुर पोलीस ठाणे गहाळ रजिस्टर क्र. ३२८८६/२०२३ अन्वये मिसिंग दाखल आहे.

सदर घटनेच्या अनुषंगाने माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरन अधिकारी व अंमलदार यांनी एव्हरशाईन सर्कल परिसरातील एकुण १० ठिकाणचे सि.सि.टी.व्ही कॅमेरे तपासुन सदर महिलेने प्रवास केलेल्या ऑटो रिक्षाचा क्रमांक प्राप्त करुन रिक्षा चालकाचा शोध घेवुन त्याचेकडे तक्रारदार यांचे गहाळ झालेल्या मंगळसुत्राबाबत बारकाईने व कौशल्याने विचारपुस करुन तक्रारदार यांचे गहाळ झालेले ४० ग्रॅम वजनाचे रु २,१०,०००/- किंमतीचे मंगळसुत्र हस्तगत करुन तक्रारदार यांना परत केले.

सदरची कारवाई श्रीमती पौर्णिमा चौघुले/श्रिंगी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०२, श्रीमती पद्मजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संपतराव पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. मिलिंद साबळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री ऋषिकेश पवळ (प्रशासन) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पो.उ.नि. सनिल पाटील, पो.ह. शैलेश पाटिल, पो.ह. शामेश चंदनशिवे, पो.ह. धनंजय चौधरी, पो.शि. गोविंद लवटे, पो.शि. आनंदा गडदे व पो.शि. प्रविण कांदे यांनी यशस्विरीत्या केलेली आहे.

